# The Baptist Tabernacle of Los Angeles

1329 South Hope Street, L.A. Civic Center

Mailing Address:
P. O. Box 15308
Los Angeles, CA 90015
Phone: (213) 744-9999
E-mail: rlhymersjr@sbcglobal.net
www.sermonsfortheworld.com
www.baptisttabernacle.com

Dr. R. L. Hymers, Jr.
Founding Pastor

Dr. Christopher L. Cagan
Pastor


God Bless You At Christmas

डिसेंबर, 2019

प्रिय मित्रांनोः

मला वाटते की मी तुम्हांला एक नाताळच्या आनंदा प्रित्यर्थ पत्र पाठवावे. परंतू, खरे सांगायचे तर, मागील दीड वर्षात मी मंडळीतील फुटीचा ख-या अर्थाने भयंकर अनुभव घेतला.

मागील वर्षाच्या किती तरी अगोदर याला सुरुवात झाली होती. आमचे एक जेष्ठ डिकन एका दुस-या पाळकाबरोबर गुप्त बैठका घेत होते. त्या दोघांनी आमची मंडळी तोडण्याची योजना केली. त्या दोघांनी दुसरी मंडळी सुरु करण्याची व तेथे आमचे शक्य तितके सभासद ओढून घेण्याची योजना केली. त्या दरम्यानच्या काळात मला हे समजले परंतू मंडळी तुटण्यापासून वाचविण्यास मला उशीर झाला.

जेव्हां त्या असंतुष्ट डिकनने मला “ठोसा-ठोसी” मध्ये ओढण्याचा प्रयत्न केला तेव्हां त्याची सुरुवात झाली. त्याच्याशी लढण्यास मी नकार दिला, तेव्हां तो मंडळी सोडून गेला. लगेचच दुसरे त्याच्यामागे गेले. डिकनच्या अध्यक्षाने त्याच्या स्वतःच्या संकेतस्थळावर अश्लिल चित्र टाकले. “फूटून” गेलेल्यापैकी एकाने मला ब्लॅकमेल करण्याचा प्रयत्न केला, आणि पोलीस त्यात सहभागी झाले होते. डिकनचा अध्यक्ष व त्याची पत्नी आमची मंडळी सोडून गेले.

त्याच वेळेला, जेष्ठ डिकन उघडपणे कार्यरत झाला. त्याने आमची मंडळी सोडली व तो शक्य तितक्या आमच्या लोकांना तिकडे ओढण्याचा प्रयत्न करु लागला. कारण हा जेष्ठ डिकन गेली कांही दशके आमच्या मंडळीत पुढारी म्हणून होता, पुष्कळ लोक त्याच्यामागे गेले व त्यांनी आणची मंडळी सोडली. दरम्यानच्या काळात तुटणे संपले व तो आमच्या अर्ध्या लोकांना त्याच्याकडे नेण्यास समर्थ ठरला.

त्याचवेळी माझी शाररिक व्याधी वर उफाळून आली आणि मी दोन्ही रविवारच्या उपासनेत उपदेश देऊ शकत नव्हतो. सेमीनरीतील विद्यार्थ्याने रविवारच्या सकाळी उपदेश दिला. परंतू तो माझ्या समोर उभा राहण्यास खूपच अननुभवी होता तसेच त्याचे बरेच जवळचे मित्र या फुटीमध्ये मंडळी सोडून गेली होती. 20 फेब्रुवारी ह्या तरुणाने माझ्या बरोबरची सहभागिता मोडली. त्याने व त्याच्या आईने आमची मंडळी सोडली व ते नवीन-सुवार्तिक मंडळीत जाऊ लागले. ह्या उपदेश देण्या-या तरुणाला मी माझा जवळचा मित्र समजत असल्याने, हे माझ्यासाठी भयंकर असे होते. 23 फेब्रुवारी रोजी मी माझ्या पाळक पदाचा राजीनामा दिला आणि डॉ. ख्रिस्टोफर कागेन नवीन पाळक झाले. निवृत्त मार्गदर्शक पाळक म्हणून नियुक्ती करण्यात आली. मी खूप अशक्त असलेने

सभेला जावू शकत नव्हतो. 3 मार्चला, डॉ. कागेननी माझ्या सेवानिवृत्तीची व स्वतःच्या पाळक म्हणून नेमणूकीची घोषणा केली. डॉ. कागेन हे मी पाहिलेल्यांपैकी एक, वुरब्रँड पाळकापेक्षाही जास्त महान ख्रिस्ती आहेत. त्यांच्या नेतृत्वाशिवाय आमची मंडळी पुन्हा उभारी घेऊ शकली नसती.

परंतू चांगल्या गोष्टी घडू लागल्या. 26 जानेवारी रोजी आपल्या संकेतस्थळावर 41 व्या भाषेची भर पडली. त्याच दिवशी (26 जानेवारी) आपले "ॲप" अँड्राईड व आयफोन साठी सुरु झाले. तेव्हां पासून जगभरातून हजारो लोक ह्या "ॲप"च्या माध्यमातून आपल्याशी जोडले गेले आहेत, माझे विशेषकरुन मित्र, न्यूयार्क शहरातील यहुद्यांसाठी असलेले मिशनरी या सर्वांचे आभार. त्यानंतर आमच्या 42 व्या भाषेची भर पडली – ती आफ्रिकेतील मालवी लोकांची मुख्य भाषा आहे. 23 फेब्रुवारी रोजी, अधिकृतपणे डॉ. कागेन हे मंडळीचे पाळक झाले आणि माझी निवृत्त मार्गदर्शक पाळक म्हणून प्रतिस्थापना केली.

हे सांगण्याची गरज नाही की, या सर्व गोंधळात मी अशक्त व आजारी पडलो होतो. या सर्वात मी माझ्या पत्नीचा विशेष ऋणी आहे – जी माझ्या पाठीशी सदवै उभी होती. 27 फेब्रुवारी पासून ते 20 मार्च पर्यंत मी तिला विश्रांतीसाठी सुट्टीला अरिझोनाला घेऊन गेलो. 20 मार्च रोजी, रविवारच्या संध्याकाळच्या - मी प्रचारासाठी परत आलो.

त्यानंतर आमच्या मंडळीची इमारत विक्रीकरिता काढली होती. 14 एप्रिल रोजी जुन्या इमारतीत माझा 78 वा वाढदिवस साजरा करण्यात आला. "सुवार्तेचा विस्फोट" हे आमचे पाठ्य पुस्तक असा वापर करुन, 7 मे रोजी मंडळीतील विश्वासू तरुणांमध्ये मी शिष्यत्वाचा गट सुरु केला. 22 मे ते 29 मे, डॉ. कागेननी मला व माझ्या पत्नीला सॅन फ्रान्सिस भागातील बाप्टिस्ट चर्च व तेथील पाळकाला भेट देण्यासाठी नेले. आम्ही माईक व मोना रिले यांनाही भेटलो, जे मरीन कौंटी मध्ये मी सुरु केलेल्या मडंळीचे पुष्कळ वर्षे पाळक होते. माईकनी मला खूप प्रोत्साहन दिले, आणि त्यांच्या मंडळीच्या 50 व्या वर्धापनाला बोलण्याचे आमंत्रण त्यांनी मला दिले. इतर लोक एवढे दयाळू नव्हते, कारण त्यांनी मंडळीतील फुटीबद्दल मला दोष दिला, ज्याचा मला खूपच त्रास झाला.

28 जुलै रोजी डॉ. कागेन यांच्या 66 व्या वाढदिवसानिमित्त आमच्या मंडळीत मोठी मेजवानी आयोजित केली होती. तेथे नंतर आमचे सॅन गॅब्रीएल वॅली येथील नव्या मंडळीचे, "द चायनीज बाप्टिस्ट टॅबरनिकल ऑफ ग्रेटर लॉस एंजिल्स" असे नामांतर केले जाईल अशी घोषणा केली. तेथे आम्ही नवीन इमारत खरेदी केली आहे आणि मग करार लवकरच संपुष्टात येईल.

जुलैच्या शेवटी मी मिसेस हायमर्सला आणखी एका छोट्याशा सुट्टीवर ओसियनसाईड येथे घेऊन गेलो. माझी पत्नी, एलिना, ही निसंकोचपणे संपूर्ण जगातील सर्वात चांगली पाळकाची पत्नी आहे. माझा मुलगा रॉबर्ट लेल्ली व मी आम्ही दोघानी तिला व तिच्या आई वडीलांना इस्त्राएलला पाठविले. 17 नोव्हेंबर पासून रविवारी सकाळी व संध्याकाळी मी एक उपदेशाची मालिका सुरु केली. ब-याच काळानंतर मी रविवारच्या दोन्ही उपासनेत बोलण्यास शाररिकरित्या सक्षम ठरलो. डॉ. कागेन यांच्या नेतृत्वात व कष्टात, दोन तरुणांचे तारण झाले, आणि कित्येक चिनी तरुण मंडळीस येऊ लागले. डॉ. कागेन यानी त्यांचे लॉस एंजिल्स शहराच्या खालच्या भागातील घर विकले, आणि सॅन गॅब्रीएलच्या जवळ दुसरे घर शोधत आहेत. पुढील कांही महिन्यात आम्ही आमची मंडळी नवीन इमारतीत स्थलांतरीत करीत आहोत.

मंडळीतील फुट आता संपली आहे. मला कांही दिवसापूर्वी असे सांगण्यात आले की, आशेच्या नगरात, माझा कर्करोग बरा होत आहे. डॉ. कागेन, माझी पत्नी आणि मी माझी मुले व नातवंडे यांच्यासह उपकारस्तुति केली, आणि संकटकाळात जे आमच्याबरोबर राहिले त्यांचेही आभार मानले. एकत्रितपणे आमचा खूप चांगला वेळ गेला!

***आम्ही WWW.SERMONSFORTHEWORLD.COM या संकेतस्थळावर***
***आमचे शेकडो जगा- करिता- वचनाचे उपदेश बेचाळीस भाषेतून उपलब्ध करीत आहो.***

प्रभू परमेश्वर आपणां सर्वांना आशिर्वादीत करो! आम्ही चिनी मंडळी सुरु करीत असतांना आमची प्रार्थनेत आठवण ठेवा!



माझ्या कुटुंबाचा मला अभिमान आहे. डावीकडून ते उजवीकडे, वेस्ली, बेबी हन्नासह लेस्ली, मी स्वतः, बेबी सारासह एलिना, लेस्लीची पत्नी जीन, एलिनाची आई लिंडा आणि तिचा भाऊ आयर्विन क्युलर.

येशू ख्रिस्त आपला तारणारा त्याची स्तुति असो!



आर. एल. हायमर्स, ज्युनि.,
डी.मिनी., टीएच.डी., लिट.डी.
फिलिप्पै 4:13

“ह्या जिवंताच्या भूमीवर परमेश्वर खात्रीने माझे कल्याण करील, परमेश्वराची प्रतिक्षा कर; खंबीर हो, हिम्मत धर; परमेश्वराचीच प्रतिक्षा कर” (स्तोत्र 27:13-14).

***आम्ही WWW.SERMONSFORTHEWORLD.COM या संकेतस्थळावर आमचे शेकडो जगा- करिता- वचनाचे उपदेश बेचाळीस भाषेतून उपलब्ध करीत आहो.***